# विद्यार्थी, शिक्षण संकुलांचे असामाजिक तत्त्वांपासून रक्षण करण्याची गरज

## यूजीसीचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'विद्यार्थ्यांनी विद्यापीठात शिकण्याचा, आपले उत्तम करिअर घडवण्याचा आनंद घेतला पाहिजे. राजकीय विचारधारा, राजकीय स्वार्थासाठी विद्यापीठाची रणभूमी केली जाऊ नये. आपण आपल्या विद्यार्थ्यांचे आणि शैक्षणिक संकुलाचे असामाजिक तत्त्वांपासून रक्षण करण्याची आवश्यकता आहे,' असे मत विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी शुक्रवारी मांडले.

विश्वकर्मा विद्यापीठाच्या पहिल्या पदवीप्रदान समारंभात डॉ. पटवर्धन बोलत होते. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष प्रदीप भार्गवा, विद्यापीठाचे अध्यक्ष भरत अगरवाल, कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जबडे, विश्वस्त राजकुमार अगरवाल आदी या वेळी उपस्थित होते.

सध्या सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर डॉ. पटवर्धन म्हणाले, 'विद्यापीठे आणि शैक्षणिक संकुलांचा वापर ज्ञानाचे मंदिर म्हणून केला पाहिजे. गुणवंतांना शिष्यवृत्ती, शैक्षणिक गुणवत्तेसाठी काम करण्याची गरज आहे. शिक्षणाचा वापर पर्यावरण आणि शांततेसाठी झाला पाहिजे. तरुणांनी राजकारण्यांचे पाळीव समर्थक न होता उत्तम दर्जाचे उच्चशिक्षण घेण्याकडे लक्ष दिले पाहिजे. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण करताना विद्यार्थी हिंसेपासून दूर कसे राहतील याकडे लक्ष देण्याची गरज आहे.'

'आज जगात तरुणांसाठी रोजगाराच्या अनेक संधी आहेत. त्या संधी प्राप्त करण्यासाठी तरुणांनी प्रयत्न करण्याची गरज आहे,' असे भार्गवा यांनी सांगितले.